


# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण


**मुख्य संपादक**
प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

**संपादक**
प्रा. कांतीलाल सोनवणे
प्रा. अतिष मेश्राम
डॉ. प्रियंका सुलाखे

अथर्व

अथर्व पब्लिकेशन्स

**लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण**

Gender Equality and Women Empowerment

© सुरक्षित

ISBN : 978-93-87129-94-8

Book No. : 603

**प्रकाशक**

युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**

धुळे : १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.

संपर्क : ९४०५२०६२३०

**जळगाव** : तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी, जळगाव ४२५००१. संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

ई-मेल : atharvapublications@gmail.com

वेबसाईट : www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती** : २० ऑक्टोबर २०१८

**अक्षरजुळवणी** : अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य** : ६९५/-

**ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

*निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे दि. २० ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रातील निवडक लेख.*

*या पुस्तकात समाविष्ट लेखांचे हक्क ज्या-त्या लेखकांकडे असून त्यांच्या मताशी मुख्य संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.*

- स्त्री-पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरण ............ ३२६
  – प्रा. सुनिता संतोष पवार
- स्त्री सबलीकरणातून वाढलेला खान्देशातील ग्रामीण ........ ३२९ व आदिवासी महिलांचा राजकीय सहभाग
  – प्रा. विजय पंडित सुर्यवंशी
  – प्रा.डॉ. सुरेंद्र अंबर मोरे
- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीच्या .............. ३३५ सद्य:स्थितीचे अध्ययन
  – प्रा.डॉ. रघुनाथ महाजन
  – प्रा. पुंडलिक खांडेकर
- वडार समाजातील महिलांच्या समस्यांचे अध्ययन ........... ३३८
  – भामरे कल्पेश अमृत
  – जाधव तुषार भगवान
- आंतरजातीय विवाहाबाबत युवतींच्या मतांचे अध्ययन....... ३४३
  – प्रा.डॉ. संजीव पगारे
  – उफाडे गणेश सुनिल
- भारतीय संविधान और महिला संरक्षण .................... ३४७ : संवैधानिक एवं विधिक उपबंध
  – प्रा. अल्पना वैद्य
- सशक्त स्त्री एवं संरक्षण प्रावधान ........................ ३५१
  – डॉ.एस.के. गोयल
- भारत की प्रसिद्ध हरित योद्धा पर्यावरणविद ................ ३५६
  – डॉ. परविंदर कौर खनूजा
- महिला सशक्तीकरण की दिशा में समावेशी लोकतंत्र ........ ३५९ का योगदान
  – प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा
- मृदुला गर्ग के उपन्यासों में नारी सबलीकरण .............. ३६५
  – डॉ.प्रा. वनिता त्र्यंबक पवार
- महिला – सशक्तिकरण और वर्तमान स्थिती ............. ३७०
  – डॉ. करुणा दत्तात्रय अहिरे

# स्त्री-पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरण

- प्रा. सुनिता संतोष पवार
कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, जि. नंदुरबार

पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात व्यक्तिमत्व विकासाची समान संधी म्हणजे स्त्री-पुरुष समानता होय, पुरुषाला जशी सुख-दुःख आहेत तशीच स्त्रिलासुध्दा आहेत, याची जाणीव स्त्री-पुरुषांत जागृत करणे म्हणजे स्त्री-पुरुष समानता. स्त्री-पुरुषानां जीवनाच्या सर्व क्षेत्रांत समान हक्क आणि अधिकार मिळणे, समान वागणुक आणि समान संधी मिळणे असली समानतेचा अर्थ होतो. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना विकासाच्या सर्व संधी समानतेत समाविष्ट आहेत.

समानता म्हणजे स्पर्धात्मक बरोबरी नाही तर घरातील आर्थिक, सामाजिक व कौटुंबिक निर्णय जे आत्तापर्यंत फक्त पुरुष घेत होता त्यासर्व निर्णयांमध्ये स्त्रीचा सहभाग असणे, नोकरी करणे, पुरुषांच्या बरोबरीने सर्व कामे केली, त्यांच्यासारखे कपडे घातले म्हाजे समानता येत नाही. बहुतांशी पुरुषांना निर्णय घेताना मी किती शहाण हे दाखवून द्यायचे असते. पण स्त्रीच्या कर्तृत्वावरही त्यांनी दाखविला पाहिजे, स्त्रियांनीही स्वतःची बौध्दिक क्षमता वाढवावी, पुरुषी वर्चस्व कमी करायच असेल तर आपली मूल्ये, संस्कार मुलांमध्ये रुजवणे गरजेचे आहे.

समान नागरी हक्क कायदा धर्म, पंथ या पलीकडे जाऊन स्त्रिला माणूस म्हणून बघण्याचा दृष्टिकोण देतो. तिचे हक्क, भावणा आणि समानता कायदेशिर रित्या तिला जपण्याचा अधिकार हा कायदा स्त्रियांना देतो त्यामुळे सामाजिक मानसिकतेत एक मोठा बदल होतो. स्त्री नुसती कमावती असली म्हणजे घरात समानता आहे असे नाही. एक स्त्री म्हणुन तिला जो सन्मान मिळायला हवा तो घरात आणि बाहेर सारखाच असायला हवा, स्त्रीकमावती झाली म्हणजे तिची प्रगती झाली असा गैरसमज व खोटया भ्रमात लोक वावरतांना दिसतात. कित्येक घरात आजही कमावत्या स्त्रीला फक्त आधार म्हणुन बघितल्या जाते. निर्णय घेण्याचे अधिकार आजही पुर्णपणे तिच्या हातात नाही. आजही घरात पुरुषांइतके समान हक्क स्त्रियांना नाही आणि हे स्त्रियांनी सुध्दा मान्य केले असल्यामुळे तिला आपला अधिकाराबद्दल, हक्काबद्दल तिला तितकासा विचार करावासा वाटला नाही आणि आजही ते न बोलणे म्हणजे संस्कारी असण्याचे ठळक लक्षण असल्याचे दर्शविले जाते. बदलाची सुरुवात ही नेहमी स्वतःपासुन होत असते.

जोवर एक स्त्री स्वत:ला आणि दुसऱ्या स्त्री सन्मान देणार नाही तोवर समान हक्क मिळणार नाही. कारण मान, सन्मान आणि समात हक्क स्वत:चे स्वत:मुळेच मिळत असतात, कुणाच्या नावाने मिळत असते ती फक्त ओळख

समाजातील प्रत्येक व्यक्ती सक्षम झाल्यानंतरच देशाचा विकास वेगाने घडु शकतो. मा९ा सक्षमीकरणाचा अर्थ व्यक्तीसापेक्ष आहे. एखादा व्यक्ती सक्षम झाल्यानंतर त्याचं त्याच्या आयुष्यावर नियंत्रण असते. तरुणांसाठी सक्षमीकण म्हणजे समाजाच्या प्रथा आणि परंपरा याची पर्वा न करता जगणे हा असतो. पुरुषांसाठी आर्थिक स्वावलंबन म्हणजे सक्षमीकरण तर स्त्रियांसाठी लिंग भेदापासुन स्वातंत्र्य म्हणजे सक्षमीकरण.

महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षमता वाढवणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. देशाच्या विकासात स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे. एक स्त्री सक्षम झाल्यावर संपुर्ण कुटूंब सक्षम होते. परंतु दुर्देवाने भारतात स्त्रियांना सक्षमीकरणासाठी जन्मापासुन संघर्ष करावा लागतो. स्त्री अर्भकाला त्याच्या जन्मासाठी संघर्ष करावा लागतो. समाजातील ही सत्यपरिस्थिती पाहुन सरकारने स्त्रीसबलीकरणासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

**महिला सक्षमीकरणासाठी भारत सरकारच्या विविध योजना**

- **मुलगी वाचवा, मुलगी शिकवा योजना** – या योजनेचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये लिंग गुणोत्तराच्या प्रमाणानुसार मुलींच्या कमी होत असलेल्या संख्येबद्दल जागरुकता निर्माण करणे हा आहे.
- **पतंप्रधान मातृत्व वंदना योजना** – या योजने महिलांच्या पोषणाकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. गर्भवती आणि बाळंतीणींचे कुपोषण रोखण्यासाठी त्यांना आर्थिक सहाय्य करण्यात येते.
- **किशोरवयीन मुलींसाठी योजना** – ही योजना ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुलींसाठी आहे. या योजनेअंतर्गत मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते.
- **पंतप्रधान महिला शक्ति केंद्र योजना** – या योजनेत विद्यार्थी स्वंयसेवकाच्या सहकार्याने ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण केले जाते.
- **महिलांसाठी स्व–आधार योजना** – निराधार, गरिब आणि पीडीत महिलांसाठी स्व–आधार गृहयोजना सुरु करण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत पीडित महिलांच पुनर्वसन करण्यात येते. महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकिय मदत, शिक्षण, प्रशिक्षण, सुविधा आणि कायदेविषयक सल्ला देण्यात येतो.
- **पीडित महिलांसाठी हेल्पलाईन** – हिंसाचाराने पीडित महिलांना संराक्षण,

वैद्यकिय मदत, समुपदेशन, कायदेविषयक सल्ला देण्यात येतो, पीडित महिलांना शिक्षण प्रशिक्षणही देण्यात येते.

**मानवी अधिकार आणि भारतीय महिलांची स्थिती**

महिला सक्षमीकरणासाठी केंद्र आणि महाराष्ट्र शासनाच्या ५५ पेक्षा अधिक योजना आहेत. केवळ कारुन स्त्रीयांच्या मानवी हक्कांचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी समाजाची मानसिकता बदलने अपरिहार्य आहे. स्त्रियांना कायद्याच्या आधार नव्हे कौटुंबिक व सामाजिक सुरक्षेची आवश्यकता आहे.

एन.सी.आर.बी. २०१४ ची आकडेवारी, नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो २०१४ रिपोर्टनुसार ३,३७,९२२ नोंदी महिला हिसांचाराच्या आहेत. लोकसंख्या व बजेटचा विचार केला असता ४८% महिलांकरिता महाराष्ट्र सरकारच्या एकुण प्लान बजेट खर्चाच्या केवळ ३% रक्कम महिला व बालकल्याण विभागाला दिलेली आहे. महिला व बालकल्याण हा विभाग महिला संदर्भात विशेष योजना राबवित असताना ही स्थिती आहे. तर इतर विभागातील महिलांच्या योजनांबद्दल काय स्थिती असेल याची आपण विचार करु शकतो.

**सारांश**

स्त्री-पुरुष भेद नाहीसा करण्यासाठी शिक्षणातुन प्रथम शिक्षकांच व पालकांचे मोठया प्रमाणावर प्रबोधन घडवून आणावे लागेल. शाळेत मुलां-मुलींच्या वेगवेगळ्या प्रबोधन घडवुन आणावे लागेल. शाळेत मुलां-मुलींच्या वेगवेगळया याद्या करणे, मुलींना विशेष सवलती देणे याचाही विपरीत परिणाम होऊ शकतो. पुरुष वर्चस्व या शब्दातुनच स्त्रियांची दुर्बलता चित्रित होते. घरादारातून कुटूंब प्रमुख म्हणुन पुरुषाचेच नाव असणे हे गृहीत धरलेले आहे. त्याऐवजी पुरुषाचे नाव त्याच्या पत्नी समवेत संयुक्तपणे घेतले गेले तरी पुष्कळ फरक पडु शकेल.

महिला सबलीकरणाच्या सर्व प्रक्रियेत समाविष्ट असलेल्या सर्व भागीदारांचे सहभागीत्व जोपर्यंत मानसिक दृष्टया क्रियाशील होत नाही. तोपर्यंत महिला सबलीकरणाची प्रक्रियश पूर्णत्वाला जाऊ शकत नाही. केवळ कायदा करुन स्त्रीयांच्या मानवी हक्कांचा प्रश्न सुटणार नाही. महिला संदर्भातील स्वत: महिलांची व पुरुषाची मानसिकता अद्याप बदललेली नाही ती बदलणे काळाची गरज आहे.

**संदर्भसूची**

१. प्रा. पी. के. कुलकर्णी :- मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन.
२. मानव विकास अहवाल :- भारत सरकार-२०११
३. डॉ. अरुंधती पाटील :- स्त्री, आत्मभान ते सबलीकरण, अरुण प्रकाशन, लातुर.
४. योजना :- ऑगस्ट २०१८

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)
ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA





Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi Part - II | January - March - 2019

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole

M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**

Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | शाहू महाराजांची सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक धोरणे<br>**प्रा. एस. के. पाटील** | ५३-५७ |
| १४ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण<br>**प्रा. डॉ. आर. एम. साळुंके** | ५८-६१ |
| १५ | राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारधारेचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>**डॉ. संभाजी संतोष पाटील** | ६२-६८ |
| १६ | छत्रपती शाहू महाराजांची केलेले स्त्री उत्थानाचे कार्य<br>**प्रा. डॉ. संजय जिभाऊ पाटील** | ६९-७३ |
| १७ | महाराष्ट्राचे वैचारिक अधिष्ठान : छत्रपती राजर्षी शाहू महाराज<br>**डॉ. सर्जेराव जिगे** | ७४-७८ |
| १८ | राजर्षी शाहु महाराज यांचा मानवी गुंतवणूक विषयक दृष्टीकोन व कार्य<br>**Satilal Appa Kannor**<br>**Dr. Dhanjay R. Chaudhary** | ७९-८२ |
| १९ | एक सर्वांगीन परिपूर्ण न्यायी राज - राजर्षी छत्रपती शाहू महाराज<br>**सतीश एम. बोरसे**<br>**डॉ. एच. आर. चौधरी** | ८३-८८ |
| २० | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार<br>**मुंडे दत्तात्रय रामकिशनराव**<br>**प्रा. डॉ. शेप बाबासाहेब केशवराव** | ८९-९३ |
| २१ | राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक न्यायविषयक विचार<br>**प्रा. संध्या एम. पाटील** | ९४-९८ |
| २२ | शाहू महाराजाचे सामाजिक चळवळीतील विशेष योगदान : सत्यशोधक चळवळ<br>**प्रा. डॉ. सुनिल भालेराव पाटील** | ९९-१०२ |
| २३ | राजर्षी शाहु महाराजांचे सामाजिक कार्य<br>**प्रा. सुनिता संतोष पवार** | १०३-१०५ |
| २४ | राजर्षी शाहु महाराज यांचे शेती सुधारणा विषयक धोरण<br>**प्रा. डॉ. सुरेंद्र अंबर मोरे** | १०६-११० |
| २५ | छत्रपती शाहू महाराज यांचे आर्थिक, राजकिय, सामाजिक, शैक्षणिक धोरण<br>**प्रा. सुरेश देसले** | १११-११४ |

# २३. राजर्षी शाहु महाराजांचे सामाजिक कार्य

**प्रा. सुनिता संतोष पवार**
समाजशास्त्र विभाग, वि.वि.मं.चे कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, जि. नंदूरबार.

राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे घराण्यात झाला. महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा, बहुजन विद्यार्थ्यांसाठी शाळा, बहुजन विद्यार्थ्यांसाठी वैदिक पाठशाळा, संस्कृत शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवरायांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणुन आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रिडा व आरोग्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रांमध्ये अद्वितीय स्वरुपाचे कार्य केले.

**राजर्षी शाहू महाराजांची आरक्षण विषयक भूमिका**

मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतुद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन दि. ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व तिची त्वरीत अंमलबजावणी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविले. शाळा दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला.

**जातिभेदाविरुद्ध लढा**

तत्कालिन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गाचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवुन शिक्षण व संपत्तीचा अधिकार नाकारला. त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटीश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावाली लागत असे. शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करुन गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

**शाहू महाराजांचे स्त्री शिक्षण विषयक विचार**

छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला होता. स्त्रियांची वैचारिक प्रगल्भता वाढविण्यासाठी स्त्रीला शिक्षण मिळावे असा त्यांचा विचार होता. स्त्री शिक्षणामुळे निश्चितच त्यांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊन त्यांनाही समाजात मानाने जगण्याचा अधिकार आहे हे कळून येईल. या अनुषंगाने स्त्री शिक्षणाचा प्रचार व प्रसार होणे शाहूंना अगत्याचे वाटत होते. त्यांच्या मते मुलींसाठी काही स्वतंत्र शाळा स्थापण्यात याव्यात. त्याचबरोबर सहशिक्षणाच्या शाळांनाही प्रोत्साहन दिले जावे.

शाहू महाराजांच्या मते मुलींसाठी केवळ शाळा स्थापन करुन भागणार नव्हते तर मुलींना शाळेत आणण्यासाठी पर्यायी उपाययोजना करणे क्रमप्राप्त होते. या अनुषंगाने शाहू महाराजांनी मुलींच्या मोफत शिक्षणाचा उपाय सुचविलेला होता. शाहूंच्या मते प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत असावे. त्यांनी राजाराम कॉलेजमधील मुलींना मोफत उच्चशिक्षण सुरु केलेले होते.

**स्त्रीयांविषयक कायदे निर्मितीत शाहू महाराजांचे योगदान**

भारत देशाच्या कट्टर पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्री जातीवर अनेक अत्याचार व अन्याय होत होते. स्त्रियांचे जीवन पडदा पद्धत, विधवा विवाह बंदी, शिक्षण बंदी, बालविवाह यासारख्या रुढी परंपरांनी पुर्णपणे जखडले होते. यावर वाचा फोडण्याचे कार्य अनेक समाज सुधारकांनी केले. महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाची चळवळ सुरु केली. राजर्षी शाहू महाराजांनी ह्या चळवळीस प्रोत्साहन दिले. स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदेही अंमलात आणले. स्त्रियांची समाजाकडुन, कुटुंबाकडुन होणारी पिळवणूक रोखण्याचा मोठा प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी अनेक कायदे केलेत.

**विधवा पुनर्विवाह कायदा**

शाहू महाराजांनी जुलै १९१७ मध्ये आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. विधवांच्या पुनर्विवाहामध्ये अनेक अडचणी येत होत्या. त्या कायद्याच्या आधारे दुर केल्या.

**आंतरजातीय विवाह कायदा**

हा कायदा १२ जुलै १९१९ मध्ये कोल्हापुर इलाख्यातील 'विवाहसंबंधी कायदा' या नावाने प्रसिद्ध झाला. त्या काळात आंतरजातीय विवाह शास्त्रसंमत नसल्याने ते बेकायदेशीर ठरत असे. महाराजांनी असे विवाह कायदेशीर ठरवणारा व धर्मातील रुढींना फाटा देऊन ज्यांना नोंदणी पद्धतीने विवाह करायचा असेल त्यांना तसे कायदेशीर स्वातंत्र्य देणारा कायदा अंमलात आणला, समाजसुधारणेच्या क्षेत्रातील हे एक क्रांतिकारक पाऊल होते.

**घटस्फोटाचा व वारसाचा कायदा**

शाहू महाराजांनी १९१९ साली आपल्या संस्थानासाठी घटस्फोटाचा कायदा जारी केला. शाहू महाराजांनी घटस्फोटाविषयाचा जो कायदा लागू केला त्यात स्त्रीच्या हक्काचे रक्षण कसे होईल, घटस्फोटानंतर स्त्रीच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था कशी केली जाईल, त्याकडे लक्ष देऊन कायद्याची कलमे तयार केली. तसेच वैवाहिक संतती असेल तर त्यांचा ताबा व शिक्षणाबद्दलची व्यवस्था ही या कायद्याने लावली गेली.

**समारोप**

आरक्षणामुळे भारतीय समाजातील मक्तेदारी संपुष्टात आली. समाजात सामाजिक समता निर्माण होऊन आरक्षणामुळे शैक्षणिक, सामाजिक उन्नती झाल्याचे आपण आज अनुभवतो आहोत. आज महिला सक्षमीकरणासाठी सर्वत्र कामकाज सुरु आहे. यात महिलांसंदर्भात अनेक सामाजिक सुधारणा तसेच महिलांसाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने कायदे तयार झाले आहेत. स्वत:चा विकास करण्यासाठी त्यांना शिक्षणाची संधी देणे आवश्यक आहे असे शाहू महाराजांनी ओळखले. अशा प्रकारे यांचा विचार प्रवाह यांनी केलेली सामाजिक क्रांती आजच्या दृष्टीने आपल्याला मार्गदर्शक ठरत आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. धनंजय किर - राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
२. डॉ. जयसिंग पवार - राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व कार्य.
३. कमलाबाई देशपांडे - स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल.
४. इंटरनेट - गुगल